**जाब देणार क्र. 1 ची साक्ष**

**शपथेवर सुरु...**

**जाब देणार क्र. 1 ची शपथेवर पुढील सरतपासणी – जाब देणार क्र. 1 चे श्री. वाय. आय. ठोले वकील यांच्यामार्फत :**

01. मी निशाणी **नि. सी–11** वर पुराव्याचे शपथपत्र दाखल केले असून त्यामध्ये लिहलेला मजकूर बरोबर आहे व त्याखाली माझी सही आहे.

**जाब देणार यांची शपथेवर उलटतपासणी – श्री. बी. आर. कावरे वकील तक्रारदारातर्फे :**

02. आमची कंपनी ईंफ्रास्ट्रक्चर पुरविण्याचे काम करते. हे म्हणणे खरे आहे की, टॉवर उभारण्याकरिता जमीन लिजवरती घेणे, टॉवरची उभारणी करणे व सदर टॉवरचा मेंटेनंस करणे ही कामे इंडस टॉवर यांना करावी लागतात. हे म्हणणे खरे नाही की, हे काम इंडस टॉवरचे प्राथमिक काम आहे. साक्षीदार सांगतो की, सदर काम इंडस टॉवरचे एक महत्वाचे काम आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर टॉवरच्या मेंटेनंसकरिता आम्हाला तंत्रज्ञांची गरज असते. हे म्हणणे खरे नाही की, आमचे हे काम सततचे काम आहे. आम्ही सदरचे काम 2008 पासून करतो.

03. आबासाहेब साळूंके यांना 2009 साली नियुक्त करण्यात आले होते याबदद्ल मला सांगता येणार नाही. साक्षीदार सांगतो की, तो त्यांचा कामगार नाही. हे मला माहिती नाही की, आम्ही त्याला पांडव ईलेक्ट्रीकलच्या नावाने दि. 25.9.2009 ते 30.06.2012 या कालावधीत कामावर ठेवले होते. हे म्हणणे खरे नाही की, तो आमच्या देखरेखीखाली व आमच्या सुचनेनुसार काम करत होता. वर्ष 2008 ते 2012 च्या दरम्यान आम्ही कोणता कॉन्ट्रॅक्टर ठेवला होता याची मला माहिती नाही. टिमलिज सोबतचे आमचे अॅग्रीमेंट 2012 साली झाले. सदर करारानुसार आम्हाला ज्या कामाची आवश्यकता असेल ते काम करण्याकरिता आम्हाला माणसं पुरवण्याची जवाबदारी टिमलिजवर देण्यात आली होती. सदर करारात कोणत्या प्रकारचे काम

करायचे आहे याची नोंद नव्हती. टिमलिजकडून पुरवण्यात आलेल्या कामगारांना आम्ही औरंगाबाद व औरंगाबादच्या जवळ असलेल्या ठिकाणी काम देत होतो. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही कामगारांना प्रशिक्षण दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही कामगारांना प्रमाणपत्र ईश्यु केले होते. हे म्हणणे खरे नाही की, कामगारांना आमच्या ईन्स्टीटयुटमध्ये ट्रेनिंग देण्यात आले होते. आम्ही कर्मचा–यांना ॲप्रेसिएशन लेटर दिले होते याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कामगारांना ओळखपत्र दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, तक्रारदार हा आमच्याकडे तंत्रज्ञ म्हणून काम करत होता. आम्ही टिमलिजचे कॉट्रॅक्ट लेबर ॲक्टप्रमाणे रजिस्ट्रेशन केले होते. हे म्हणणे खरे आहे की, कॉट्रॅक्टर नियुक्त झाल्यावर त्यांना लायसन्सची गरज असते. हे म्हणणे खरे आहे की, लायसन्स मिळण्याकरिता फॉर्म क्र. 5 दयावा लागतो. सक्षम प्राधिकारी यांनी रजिस्ट्रेशनमध्ये कामाचे स्वरूप काय म्हणून केले होते हे मला रजिस्ट्रेशन पाहून सांगता येईल. मी रेफरन्समध्ये सदर रजिस्ट्रेशन दाखल केले आहे. सदर रजिस्ट्रेशन मी दाखल करू शकतो. हे म्हणणे खरे नाही की, सदर रजिस्ट्रेशनप्रमाणे आम्ही तंत्रज्ञांची नियुक्ती ही कॉन्ट्रॅक्टरमार्फत करू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, रजिस्ट्रशनप्रमाणे आम्ही फक्त सुरक्षा रक्षकांची नियुक्ती कॉन्ट्रॅक्टदारांमार्फत करू शकतो.

मध्यन्हाची वेळ असल्यामुळे उलटतपास तहकूब.

**श्रवणोत्तर स्विकृत..**

Digitally signed by SHIRISH SUDHAKAR SAHASRABUDHE
Date: 2025.08.08 14:50:19 +0530

औरंगाबाद
दि.07/08/2025

(एस.एस.सहस्त्रबुध्दे)
न्यायाधीश
2रे कामगार न्यायालय, औ.बाद.